वि.दि.मु.क्र.३/२०२३
नि.क्र. ४२

**वि.दि.दा.क्र.३/२०२३**
**नि.क्र.४२.**
**वादी तर्फे साक्षीदार क्र.३**

**वादीतर्फे साक्षीदार क्र. ३ चा पुरावा शपथेवर-**

**नांव:** दत्तात्रय प्रेमनाथ गायकवाड

**वय: ५५** वर्षे, **धंदा:** मंडळ अधिकारी**,**

**रा.** उमरगा, ता. उमरगा, जि. उस्मानाबाद/धाराशिव

**साक्षीदाराचा सरतपास शपथेवर वादी तर्फे विधिज्ञ श्री. एस.एस. खरसडे यांच्यामार्फत**

१. मी सध्या मंडळ अधिकारी म्हणुन ईटकळ, ता. तुळजापुर येथे कार्यरत आहे. मला या न्यायालयाचे साक्षी समन्स प्राप्त झाले होते. साक्षी समन्स मधील नमूद संचिका आज मी माझ्या सोबत आणलेली आहे. सन २०२२-२३ साली मी मंडळ अधिकारी म्हणुन वाशी येथे कार्यरत होतो. तहसीलदार, वाशी यांनी मला या प्रकरणातील वादी यांनी दिनांक २०.०५.२०२२ व २२.०६.२०२२ रोजी दिलेल्या अर्जाच्या अनुषंगाने स्थळ पाहणी पंचनामा करण्यासाठी आदेशीत केले होते. मला तहसीलदार यांनी लेखी पत्र दिले होते. मला त्यांनी वाशी येथील सर्वे नंबर २८७/ब व २८८/अ या जमीनीत स्थळ पाहणी करुन पंचनामा करण्यासाठी सुचना दिली होती. त्या पत्राचे मी अवलोकन केले. त्यातील एक अर्ज वादीने त्याचा रस्ता अडवला व दुसरा अर्ज त्याच्या पाईपलाईनचे नुकसान केले म्हणुन दिला होता. त्या अर्जाच्या अनुषंगाने मी तक्रारदार तसेच सामनेवाला यांना नोटिसा काढल्या होत्या. त्या नोटिसची प्रत मी प्रकरणात दाखल करु शकतो. मी त्यांना दिनांक २०.०७.२०२२ रोजी स्थळ पाहणी पंचनाम्यासाठी सकाळी ११.०० वाजता संबंधीत ठिकाणी उपस्थित रहाण्यासाठी सांगितले होते. सदरहु तारखेला व वेळेस तक्रारदार तसेच सामनेवाला त्याठिकाणी उपस्थित होते. त्यावेळेस तेथे इतर दोन ते तीन इसम पंच म्हणुन हजर होते. मी त्याठिकाणी जाऊन सर्वे क्र. २८७, २८८ व २९० या ठिकाणाची पाहणी केली. त्यावेळेस मला सर्वे नंबर २८७ व सर्वे नंबर २९० च्या मधुन वहिवाटीचा रस्ता आढळुन आला. त्या रस्त्याची रुंदी अंदाजे तीन ते चार फुट होती. तो रस्ता सर्वे नंबर बांधावर होता. त्याठिकाणी मला वहिवाटीच्या पाऊलखुणा आढळुन

आल्या. त्या ठिकाणी चार चाकी वाहन जाण्यास रस्ता नव्हता. तक्रारदार व सामनेवाला यांचे असे म्हणणे आले की, त्या क्षेत्राची मोजणी करुन हद्दी खुणा कायम कराव्यात. या सर्व परिस्थीतीचा मी पंचनामा तयार केला. त्या पंचनाम्यावर मी, तक्रारदार, सामनेवाला व पंचानी सहया केल्या. मी तो मुळ पंचनामा आज सोबत आणला आहे. आता मला दाखविण्यात आलेल्या साक्षांकित पंचनाम्याची प्रत ही तीच आहे. त्यातील मजकुर मुळ पंचनाम्यानुसार बरोबर आहे. त्यास **निशाणी क्र. ४३** देण्यात येतो.

२. वादीने दिलेला दुसरा तक्रार अर्ज हा त्याची पाईपलाईन फोडल्याबाबत होता. सदरहु पाईपलाईनची मी पाहणी केली. ती पाईपलाईन सर्वे नंबर २८७/अ आणि २८७/ब च्या बांधावरुन होती. मी पाहणी केली त्यावेळेस ती पाईपलाईन उकरुन तोडलेली होती. मी तक्रारदार व सामनेवाला यांच्या सर्वे नंबर जमीनीचा नजरी नकाशा तयार केला. मला त्याठिकाणी तक्रारदाराचे फिल्टर आणि वॉल आढळुन आले. तसेच, सामनेवाल्याचे फ्रेश वॉल आढळुन आले. मला तक्रारदाराच्या शेतात दोन एकर ऊस आढळला व त्यापैकी अर्धा एकर ऊस तोडल्याचे आढळुन आले. मी त्या सर्व दिसत्या परिस्थीतीचा पंचनामा तयार केला. मी पंचनाम्यावर सही केली. तसेच, त्यावर पंचांनी, तक्रारदार व सामनेवाला यांनी सहया केल्या. मी आज माझ्यासोबत मुळ पंचनामा आणला आहे. आता मला दाखविण्यात आलेल्या साक्षांकित पंचनाम्याची प्रत ही तीच आहे. त्यातील मजकुर मुळ पंचनाम्यानुसार बरोबर आहे. त्यास **निशाणी क्र. ४४** देण्यात येतो.

३. मी तयार केलेल्या दोन्ही पंचनाम्याच्या अनुषंगाने तहसीलदार यांना माहिती देण्यासाठी वस्तुनिष्ठ दोन अहवाल तयार केले. मी ते अहवाल तहसीलदार, वाशी यांना दिनांक २०.०७.२०२२ रोजी सादर केले. आता मला दाखविण्यात आलेल्या साक्षांकित अहवालाच्या प्रती या त्याच आहेत. त्यातील मजकुर मुळ अहवालानुसार बरोबर आहे. त्यास अनुक्रमे **निशाणी क्र. ४५ व ४६** देण्यात येतात.

**उलटतपास प्रतिवादी क्र.१ व २ तर्फे विधिज्ञ श्री. आर. व्ही. मोटे यांच्यामार्फत-**

४. वादीने तहसीलदार, वाशी यांच्याकडे सादर केलेले दोन्ही अर्ज आज मी संचिकेसोबत आणलेले आहेत. त्या दोन्ही अर्जावर तहसीलदार यांनी मंडळअधिकारी

यांनी चौकशी करावी असा कोणताही शेरा नमूद केलेला नाही. साक्षीदार स्वत:हुन सांगतो की, तहसीदार यांनी त्या अर्जाची मी चौकशी व पंचनामा करावा असा लेखी आदेश दिला होता. मला पंचनाम्याला जाण्यापुर्वी तहसील कार्यालयाकडुन तहसीलदार यांचा लेखी आदेश व तक्रारदारांनी दिलेले दोन्ही लेखी अर्ज प्राप्त झाले होते. मला त्यासोबत सर्वे नंबर २८७/ब आणि २८८/अ चे सातबारा उतारे प्राप्त झाले होते. सर्वे नंबर २८७/ब मध्ये एकच हिस्सेदार आदित्य देशमुख हा आहे. सर्वे नंबर २८८/ अ मध्येही एकच हिस्सेदार आदित्य देशमुख आहे. सातबारा उता-याला ज्याचे नांव नमूद आहे त्याला मी स्थळ पाहणी पुर्वी नोटिस दिली नव्हती. हे म्हणणे खरे आहे की, दिनांक २०.०५.२०२२ व दिनांक २२.०६.२०२२ रोजी ज्या तक्रारदारांनी अर्ज सादर केले ते सर्वे नंबर २८७/ब आणि २८८/अ चे मालक नाहीत.

५. दिनांक २२.०६.२०२२ रोजीच्या तक्रार अर्जातील मसुदामध्ये सामनेवाल्याचे नांव नमूद नाही. हे म्हणणे खरे आहे की, मी केलेल्या दोन्ही पंचनाम्यात सर्वे नंबर २८७ व २९० अशा सर्वे नंबरचा उल्लेख आहे. मी वाशी येथे सुमारे सात वर्षे मंडळ अधिकारी म्हणुन काम पाहिले. सर्वे नंबर २८७ व सर्वे नंबर २९० हे वाशी गावाच्या पुर्वेला आहेत. माझ्याकडे गांव नकाशा होता. त्या आधारे मी सर्वे नंबर २८७ व सर्वे नंबर २९० चे ठिकाण ठरवले. मी तो गांव नकाशा आज संचिकेसोबत आणलेला नाही. मी तो नकाशा तलाठी कार्यालयातुन घेतला होता. हे म्हणणे खरे आहे की, निशाणी क्र. ४३ व निशाणी क्र. ४४ वरील पंचनाम्यावर माझे नांव अथवा कार्यालयाचा शिक्का नाही. हे म्हणणे खरे आहे की, निशाणी क्र. ४३ वरील पंचनाम्यावर दोन ठिकाणी समक्ष म्हणुन माझ्या सहया आहेत. साक्षीदार स्वत:हुन सांगतो की, मुळ पंचनाम्यावर केवळ एक ठिकाणी माझी सही आहे. हे म्हणणे खरे आहे की, दोन्ही पंचनाम्यावर माझ्या सहीच्या खाली तारीख नमूद नाही.

६. हे म्हणणे खरे आहे की, सुर्वणमाला जगदीश पाटील ही महिला दोन्ही पंचनाम्यावेळेस हजर नव्हती. सुर्वणमाला पाटील हिच्या जमीनीचा सर्वे नंबर २९० आणि गैरअर्जदाराचा सर्वे नंबर २८७ असा आहे. सुवर्णमाला व गैरअर्जदार यांच्या जमीनीचे सातबारा मी सोबत आणलेल्या संचिकेत नाहीत. मला पंचांनी त्यांच्या जमीनीचे सर्वे नंबर

सांगितले. सर्वे नंबर २८७/ब मधील जमीन सर्वे नंबर २८८/अ च्या पश्चिम बाजुला आहे. सर्वे नंबर २९० हा सर्वे नंबर २८७/ब च्या दक्षिण बाजुला आहे. हे म्हणणे खरे नाही की, मी गैरअर्जदाराच्या कोणत्याही जमीनीत पंचनाम्यासाठी गेलो नाही.

७. निशाणी क्र. ४३ वरील पंचनाम्यापुर्वी मामलतदार कायदा अथवा महाराष्ट्र महसुल अधिनियमाखाली तहसीलदारांनी रस्त्यासंदर्भात चौकशी करण्यासाठी मला कोणताही आदेश दिला नव्हता. मी अर्जदार व गैरअर्जदाराने त्यांची जमीन मोजुन घ्यावी असे माझ्या निशाणी क्र. ४५ व ४६ वरील अहवालात नमूद केलेले नाही. ती पाईपलाईन कधी उकरुन फोडलेली होती हे मला सांगता येत नाही. त्या पाईपलाईनची एकुण लांबी किती होती हे मी पाहिली नाही. माझ्या पाहणीप्रमाणे फोडलेली पाईपलाईन सुमारे दहा ते पंधरा फुट होती. ती सुमारे दोन ते तीन ठिकाणी फोडलेली होती. हे म्हणणे खरे नाही की, मी पंचनामा करतेवेळेस त्या पाईपलाईनच्या दोन्ही बाजुस पीक उभे होते. हे म्हणणे खरे आहे की, मी पंचनामा करतेवेळेस त्या गांवचे तलाठी माझ्या सोबत उपस्थीत नव्हते. मी त्या ठिकाणाचाी पाहणी करुन पंचनामा करण्यासाठी मला सुमारे तीन तास कालावधी लागला.

८. हे म्हणणे खरे नाही की, मी वादी बाळासाहेब यांना पंचनामा करण्यापुर्वीपासुन ओळखत होतो. मी स्वत: घटनास्थळी गेलो. मी त्याठिकाणी जाण्यापुर्वी तक्रारदार, सामनेवाला व पंच त्या ठिकाणी हजर होते. शिवाजी उंदरे, बाळासाहेब उंदरे आणि नवनाथ टकले यांच्याशी माझी पंचनाम्यापुर्वी ओळख नव्हती. त्यांना पंचनाम्याच्या ठिकाणी कोणी आणले हे मला माहित नाही. मी त्यांना त्यांचे नांव विचारले होते . परंतु त्यांचे कोणतेही ओळखपत्र पाहिले नाही.

९. हे म्हणणे खरे नाही की, तहसीलदार, वाशी यांनी तक्रारदारांनी दिलेल्या दिनांक २०.०५.२०२२ व दिनांक २२.०६.२०२२ च्या तक्रार अर्जाच्या अनुषंगाने स्थळ पाहणी करण्यासाठी मला लेखी आदेश दिले असे मी खोटे सांगतो. हे म्हणणे खरे नाही की, मी त्या आदेशाच्या अनुषंगाने घटनास्थळी भेट देऊन तक्रारदार व सामनेवाला व पंचाच्यासमक्ष निशाणी क्र. ४३ व ४४ वरील खोटे पंचनामे तयार केले. हे म्हणणे खरे नाही की, मी तसा खोटा वस्तुस्थिती अहवाल निशाणी क्र. ४५ व ४६ तहसीलदार वाशी

यांना सादर केला. हे म्हणणे खरे नाही की, मी आज खोटी साक्ष दिली.

उलट तपास पूर्ण.
फेरतपास नाही.

श्रवणोत्तर निवेदन स्वीकृत

RAHUL DATTATRAY DANGE

Digitally signed by RAHUL DATTATRAY DANGE
Date: 2026.08.06 17:51:02 +0530

ठिकाण - भूम.
दिनांक – ०६/०८/२०२६.

(राहुल द. डांगे)
सह दिवाणी न्यायाधीश व. स्तर,भूम.

**CERTIFICATE**

I affirm that, the contents of this P.D.F. file evidence are same, word to word, as per the original evidence.

| | | |
|---|---|---|
| Name of Stenographer | --- | Mr. Sayyad R.M.,<br>Stenographer G-II |
| Court | --- | Mr. R. D. Dange<br>Jt. Civil Judge, Senior Division, Bhoom,<br>District - Osmanabad. |
| Date | --- | 06.08.2026 |
| Order signed by the Presiding Officer on | --- | 06.08.2026 |
| Order uploaded on | --- | 06/08/2026 |